# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ अकोला

## कृषि तंत्र विद्यालय वरूड, (पुसद) येथील बैल/गोऱ्हे लिलावाच्या नियम व अटि

दि. 13/09/2024 रोजी सकाळी 10.00 वाजता कृषि तंत्र विद्यालय वरूड, पुसद, येथे जनावरांचा जाहीर लिलाव करण्यात येत आहे.

जनावरांच्या लिलावा करीता नियुक्त अधिकारी जनावरांचा लिलाव करतील लिलाव सुरू करण्यापुर्वी जनावरांची पुर्ण माहिती जाहीर करतील व लिलावाच्या अटी समजून सांगतील.

1. लिलावात बोली बोलण्यास सुरूवातीला रू 1000/- (एक हजार रूपये फक्त ) अनामत रक्कम म्हणुन जमा करावी लागेल कोणत्याही व्यक्तीस अनामत रक्कम भरल्याशिवाय लिलावामध्ये बोली बोलण्यास परवानगी देण्यात येणार नाही. सर्वाची बोली पुर्ण झाल्यास व त्याने जनावरे घेण्यास नकार दिल्यास सदर अनामत रक्कम जप्त करण्यात येईल मुख्य लिलाव शेतक-यांच्या हितार्थ असल्याने शेतक-यांचा शेत जमिनीचा 7/12 दाखला सोबत आणणे आवश्यक राहील.
2. लिलावात जनावरे घेण्याची अनामत रक्कम सर्वाची बोली झाल्यानंतर बोली धारकाने जनावरांची सुपुर्ण रक्कम भरल्यानंतर परत करण्यात येईल त्याचप्रमाणे अयशस्वी बोली बोलणा-यांची अनामत रक्कम लिलाव संपल्यानंतर परत करण्यात येईल.
3. बोली बोलताना बोलीची रक्कम कमीत कमी रू. 100/- रूपयानी वाढवावी लागेल. लिलावाची तिसरी फेरी पूर्ण झाल्यावर सर्वात जास्त बोली बोलणा-यांचे नाव जाहीर करून लिलावाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.
4. ज्या व्यक्तीस बोली मंजुर झाली त्या व्यक्तीस मंजुर झालेल्या बोलीच्या किंमती एवढी पूर्ण रक्कम त्वरीत अदा करावी लागेल लिलावात खरेदी केलेल्या जनावराची पूर्ण किंमत भरून संबंधित बोली धारकांच्या सदर जनावरे ताबडतोब स्वतःच्या ताब्यात घ्यावी लागेल व स्वखर्चाने न्यावे लागेल सदर जनावरांची कोणतीही जवाबदारी विभागाच्या लिलाव समितीची राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी मजुर बोलीधारकाची राहिल बोली धारकाने खरेदी केलेली जनावरे ताबडतोब ताब्यात न घेतल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधीत जनावरांच्या समिती मार्फत पुन्हा लिलाव करण्यात येईल.
5. लिलावातील जास्तील जास्त बोली स्वीकृत करणे अथवा न करणे तसेच अपेक्षेपेक्षा बोली कमी असल्यास संबंधीत जनावरे देण्याचा अथवा न देण्याचा सर्व अधिकार लिलाव समितीचा राहील त्याशिवाय लिलावात इतर बाबतीत लिलाव समिती अधिका-याचा निर्णय अखेरचा व बंधनकारक राहिल.
6. एकदा लिलावात विकत घेतलेले जनावरे कोणत्याही संबंधी दाखल परत घेतल्या जाणार नाही संबंधीत बोली धारकाने जनावरांचा ताबा न घेतल्यास अनामत रक्कम जप्त करून विद्यापीठात जमा करण्यात येईल.
7. जनावरांचा लिलाव प्रत्येकांच्या बाबतील वेगवेगळा अथवा गटागटाने करणे हे लिलाव समितीच्या मर्जीवर अवलंबुन राहील.
8. लिलाव पुर्ण करण्याचा निर्णय तसेच कोणतेही कारण न दाखवता लिलाव रद्द/स्थगीत करण्याचा अधिकार लिलाव समितीस राहील लिलाव समितीने दिलेल्या निर्णयावर कोणतीही अपील करता येणार नाही बोली धरकांना ही लिलाव अखेरचा व बंधनकारक राहील.
9. लिलाव समितीच्या कामकाजामध्ये अडथळा आणणे. आरडाओरड करणे किंवा दखल देणा-यास लिलावातून बाद करण्यात येईल व त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
10. लिलावात सर्वाच्या बोली बोलून जनावरे खरेदी केलेल्या बोली धारकास सदरहू जनावरे ताब्यात घेतल्यास ती जनावरे शेती कामाकरीता ,पाळण्याकरीता विकत घेत असून कत्तली साठी वापरणार नाही असे लेखी हतीपत्र लिहुन दयावे लागेल.
11. लिलावात विकत घेतलेले जनावरे बोली धारकाने 24.00 तासाच्या आत न नेल्यास 200रू. खावटी विभागात जमा करावी लागेल अन्यथा सदरहु बोली धारकाची रक्कम जप्त करण्यात येईल.
12. नाव नोंदणी व अनामत रक्कम भरण्याची वेळ सकाळी 10.00 ते 12.00 वाजेपर्यत राहील.
13. लिलावाचे स्थळ :- कृषि तंत्र विद्यालय वरूड, पुसद, या विद्यालयाचे परीसर.

प्राचार्य,
कृषि तंत्र विद्यालय,
वरूड (पुसद)